# <u>सहायक कक्ष अधिकारी मर्यादित विभागीय स्पर्धा  परीक्षा – 2017</u>

## <u>प्रमाणपत्र तपासणीच्या कार्यक्रमाबाबतची घोषणा</u>

आयोगातर्फे दि. 25 जून, 2017 रोजी मुंबई केंद्रावर "**सहायक कक्ष अधिकारी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा** 2017" घेण्यात आली. सदर परीक्षेतून उमेदवारांची शिफारस होण्याच्या अनुषंगाने प्रमाणपत्र तपासणीसाठी उमेदवारांची यादी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली आहे. प्रस्तुत प्रमाणपत्र तपासणी दि. **21 व 22 सप्टेंबर,** 2017 रोजी "**महाराष्ट्र लोकसेवा आयोग, 8 वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई** 400 021" येथे करण्यात येणार आहे. सदर उमेदवारांनी त्यांची मूळ प्रमाणपत्रे व विभागप्रमुखांकडून प्रमाणित करुन देण्यात आलेल्या परिशिष्ट – 6 ची प्रत तसेच प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रतींसह (2 संच) उपस्थित रहावे. उमेदवारांना प्रमाणपत्र तपासणीचे पत्र त्यांच्या प्रोफाईलमध्ये उपलब्ध करुन दिले जाईल.

2.विहित अटींची पूर्तता न करणा-या उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल तसेच प्रमाणपत्र तपासणीसाठी अनुपस्थित राहिलेल्या उमेदवारांचा अंतिम गुणवत्ता यादीसाठी विचार केला जाणार नाही. प्रमाणपत्र तपासणीअंती विहित अटींची पूर्तता करणा-या उमेदवारांची वर्गवारी, गुणवत्ताक्रम व प्रवर्गनिहाय पदसंख्या इत्यादी बाबी विचारात घेऊन शासनाकडे शिफारस करण्यात येईल. त्यामुळे प्रमाणपत्र तपासणीसाठी बोलाविण्यात आलेल्या व विहित अटींची पूर्तता करणा-या सर्वच उमेदवारांची शिफारस होईल असे नाही, याची उमेदवारांनी कृपया नोंद घ्यावी.

3.अर्जात विजा(अ), भज(ब), विमाप्र, भज(क) व भज(ड) वर्गवारीचा दावा केला असल्यास अशा उमेदवारांनी आयोगातर्फे जाहिरात ज्या वित्तीय वर्षात (एप्रिल ते मार्च) दिलेली असेल त्या पूर्वीच्या वित्तीय वर्षापासूनचे क्रिमीलेअरमध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले नॉन क्रिमीलेअर (NCL) प्रमाणपत्र, तपासणीच्यावेळी सोबत आणावे.

4.प्रस्तुत सविस्तर कार्यक्रम कृपया आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईट वर पहावा.

ठिकाण : मुंबई
दिनांक : 6 सप्टेंबर, 2017

**सु. सं. केसरकर**
**उपसचिव (परीक्षा)**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**